नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - २५९ Issue - 259 | वार रविवार दि. ८ फेब्रुवारी २०२६ Blow- Sunday Date 8 February 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मलेशियाने दिलेला सन्मान आणि प्रेम भारत कधीही विसरणार नाही

## क्वालालंपूरमध्ये आगमनावेळी मलेशियाच्या पंतप्रधानांकडून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मलेशियाच्या पंतप्रधान दातो सेरी अन्वर इब्राहिम यांच्या आमंत्रणावरून ७ आणि ८ फेब्रुवारी २०२६ रोजी मलेशियाच्या दौऱ्यावर आहेत. २०१५ नंतरचा हा पंतप्रधानांचा मलेशियातील तिसरा दौरा आहे.

विशेष सन्मान म्हणून मलेशियाचे पंतप्रधान दातो सेरी अन्वर इब्राहिम, मलेशियाचे मानव संसाधन मंत्री दातो श्री रमणन रामकृष्णन आणि मलेशियाचे उपपरराष्ट्र मंत्री दातो लुकानिसमन बिन अवांग साउनी यांच्या उपस्थितीत, क्वालालंपूर येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे जोशपूर्ण स्वागत करण्यात आले. त्यानंतर दोन्ही देशांच्या सामायिक वारशाचे दर्शन घडवणारा रंगतदार सांस्कृतिक स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला.

२०२४ मध्ये स्थापन झालेली भारत-मलेशिया व्यापक सामरिक भागीदारी अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्वाचा आहे. हा दौरा भारताच्या 'ॲक्ट ईस्ट' धोरण, हिंद-प्रशांत दृष्टीकोन आणि 'व्हिजन महासागर' या संकल्पनांचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ असलेल्या



भारत-मलेशिया संबंधांना अधिक मजबूत करण्यासाठी भारताची ठाम बांधिलकी दर्शवतो. मलेशियाने केलेलं असं स्वागत भारत लक्षात ठेवेल; कुआलालंपूरमध्ये मोदींनी जिंकली मने

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या २०२६ मधील पहिल्या परदेश दौऱ्याची सुरुवात मलेशियातून केली आहे. कुआलालंपूर येथे भारतीय समुदायाशी संवाद साधताना त्यांनी दोन्ही देशांमधील घट्ट सांस्कृतिक संबंधांवर भाष्य केले. पंतप्रधान म्हणाले की, गेल्या वर्षी आसियान परिषदेला मी उपस्थित राहू शकलो नव्हतो, परंतु माझ्या मित्राला दिलेले वचन पूर्ण करण्यासाठी मी आज मलेशियात आलो आहे. मलेशियातील भारतीयांच्या उत्साहाचे कौतुक करताना मोदींनी एक महत्त्वाची माहिती दिली की, येथील सुमारे ५०० शाळांमध्ये भारतीय भाषांचे धडे दिले जात आहेत. तसेच, भारतीय संगीत आणि चित्रपटांची लोकप्रियता दोन्ही देशांना अधिक जवळ आणत असल्याचे त्यांनी नमूद केले. मलेशियाने दिलेला सन्मान आणि प्रेम भारत कधीही विसरणार नाही, अशा भावना त्यांनी यावेळी व्यक्त केल्या. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशिया दौऱ्यादरम्यान दोन्ही देशांमधील आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला आहे. भारत आणि मलेशिया हे केवळ मित्र नसून प्रगतीचे भागीदार आहेत. भारताने गाठलेलं प्रत्येक यशाचं शिखर हे मलेशियासाठीही तितकंच अभिमानास्पद आहे, अशा शब्दांत पंतप्रधानांनी दोन्ही देशांच्या मैत्रीचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी त्यांनी एक अत्यंत महत्त्वाची तांत्रिक घोषणा केली. भारताची लोकप्रिय डिजिटल पेमेंट प्रणाली 'णझख' (युपीआय) लवकरच मलेशियामध्येही लाँच केली जाणार आहे, ज्यामुळे दोन्ही देशांमधील आर्थिक व्यवहार अधिक सोपे होतील. यासोबतच, मलेशियातील स्वामी विवेकानंदांच्या अनुयायांचा आणि आपल्या 'मन की बात' कार्यक्रमातील मलेशियाच्या संदर्भाचा उल्लेख करत त्यांनी सामायिक सांस्कृतिक वारशाचा पुनरुच्चार केला.

# जि.प., पं.स.साठी शांततेत मतदान; सोमवारी निकाल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुणे : राज्यात मोठ्या कालावधीनंतर होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी शनिवारी राज्यातील अनेक जिल्ह्यात सर्वत्र उत्साहात आणि शांततेत मतदान पार पडले. ठिकठिकाणच्या मतदान केंद्रांवर मतदारांनी रांगा लावल्या होत्या. सकाळी उत्साहात असलेला मतदानाचा वेग दुपारी मंदावला होता. सायंकाळच्या सुमारास मतदारांनी पुन्हा रांगा लावल्या. काही ठिकाणी वेळ संपल्यानंतरही रांगा लागलेल्याच होत्या. लग्नतिथीचा मुहर्त जोरात असल्याने याचा काहीसा परीणाम मतदानावर झाला. व-हाडी मंडळीनी सकाळीच मतदान केंद्रात जाऊन मतदानाचे कर्तव्य बजावले.

बारामतीत मतदान केंद्रे ओसाड

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी बारामती तालुक्यात मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. मात्र, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर लोकशाहीचा नेहमीचा उत्साह या वेळी पूर्णपणे हरवलेला दिसून आला. मतदान केंद्रांवर गर्दी नव्हती, उत्सुकता नव्हती आणि प्रचाराचा शेवटचा जोरही जाणवला नाही. गावपातळीवरील पुढारी, नेते, सत्ताधारी-विरोधक नाराज मुद्रेने मतदारांची वाट पाहत बसले होते. 'मतदान करा... शंभर टक्के मतदान झाले पाहिजे... मी विकास केला आहे... गावात पाणी दिले आहे, शेतकरी-मजुरांच्या आरोग्याची काळजी घेतो,' असे ठामपणे सांगणारे अजित पवार या वेळी कुठेच दिसले नाहीत. परिणामी, अनेक मतदान केंद्रे ओसाड भासत होती. प्रशासनाने केलेल्या जनजागृतीमुळेच मतदानाचा टक्का कसाबसा ५० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकला. या निवडणुकीवर अजित पवार यांच्या निधनाची छाया स्पष्टपणे दिसून आली. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली राजकीय पोकळी आणि भावनिक धक्का थेट मतदानावर परिणाम करणारा ठरला. त्यामुळे ही जिल्हा परिषद निवडणूक केवळ आकड्यांपुरती मर्यादित न राहता, बारामतीच्या राजकीय इतिहासातील एक भावनिक आणि

(पान २ वर...)

# अमेरिकन कृषी उत्पादनांना कोणतेही विशेष आयात फायदे दिले नाहीत; पियूष गोयलांचा दावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारताने आपल्या प्रतिस्पर्धकांवर मोठा व्यापारी फायदा मिळवला असल्याचा दावा केंद्रीय मंत्री पियुष गोयल यांनी केला. आहे की, अमेरिकेशी झालेल्या व्यापार करारामुळे भारतीय शेतकरी आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे संरक्षण झाले आहे, त्याचबरोबर अनेक कृषी उत्पादनांसाठी अमेरिकेची बाजारपेठ खुली झाली आहे. अंतरिम व्यापार आराखडा जाहीर झाल्यानंतर काही तासांनी शनिवारी एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना गोयल यांनी यावर जोर दिला की, अमेरिकेच्या कृषी उत्पादनांना कोणतेही आयात लाभ दिले जाणार नाहीत आणि भारताने लाल ज्वारी, सुकामेवा, वाईन आणि स्पिरिट्ससारख्या काही अमेरिकन वस्तूंसाठीच आपली बाजारपेठ निवडकपणे खुली केली आहे.

पियूष गोयल यांनी नमूद केले की, रशियन तेल खरेदीशी संबंधित ट्रम्प यांनी लादलेला अतिरिक्त २५ टक्के शुल्क पूर्णपणे काढून टाकण्यात आला आहे. यामुळे भारत आता अमेरिकन बाजारपेठेत अधिक स्पर्धात्मक स्थितीत आहे असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले की, ज्या उत्पादनांमध्ये आपण 'आत्मनिर्भर' आहोत, ती सर्व उत्पादने या करारातून बाहेर ठेवली आहेत. भारताने कृषी आणि दुग्धव्यवसाय क्षेत्रात आपली लाल रेषा कायम राखली आहे. अमेरिकन कृषी उत्पादनांना कोणतेही विशेष आयात फायदे दिलेले नाहीत. भारताने केवळ लाल ज्वारी, ट्री नट्स, वाइन आणि स्पिरिट्स यांसारख्या ठराविक वस्तूंसाठी आपली बाजारपेठ निवडकपणे खुली केली असल्याचे ते म्हणाले. या भारत-अमेरिका करारामुळे भारताचे शेतकरी, एमएसएमई किंवा हातमाग आणि हस्तकला क्षेत्राच्या हितसंबंधांना कोणत्याही प्रकारे बाधा पोहोचत नाही, असे त्यांनी सांगितले.

या करारामुळे भारतीय निर्यातदारांसाठी ३० ट्रिलियन डॉलर्सची बाजारपेठ खुली होईल, असा दावा त्यांनी केला. कृषी क्षेत्रात, भारतातील अनेक उत्पादने आता शून्य शुल्काने अमेरिकेला निर्यात केली जातील. त्यांनी या दिवसाचे वर्णन सुवर्ण अक्षरांनी कोरला जाणारा दिवस असे केले. चहा, मसाले, कॉफी आणि खोबरेल तेल यांवर आता अमेरिकेत कोणताही कर (टॅरिफ) लागणार नाही. केळी, आंबा, पेरू, एवोकॅडो, कीवी, पपई, अननस, मशरूम, तृणधान्ये, बार्ली, बेकरी उत्पादने, कोको उत्पादने आणि तीळ यांसारखी उत्पादनेही शून्य शुल्कासह अमेरिकन बाजारपेठेत प्रवेश करतील.

# अमेरिकेविरुद्ध सूर्या तळपला, कॅप्टन एकटा उभा ठाकला, वर्ल्ड कपमध्ये विजयी सुरुवात; अमेरिकेवर केली मात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : आयसीसी टी-२० विश्वचषकाचा बिगुल आज वाजला आणि पहिल्याच सामन्यात टीम इंडियाने आपल्या घरच्या मैदानावर म्हणजेच वानखेडे स्टेडियमवर विजय मिळवला. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळणाऱ्या भारतीय संघाने अमेरिकेचा २९ धावांनी पराभव करत स्पर्धेत विजयी सलामी दिली आहे. भारताने दिलेल्या १६१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना अमेरिकेचा संघ निर्धारित षटकांत १३२ धावांपर्यंतच मजल मारू शकला. यासह भारताने या स्पर्धेतील आपले पहिले दोन गुण खात्यात जमा केले.

नाणेफेक हरल्यानंतर प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाने ९ विकेट्सच्या मोबदल्यात १६१ धावा केल्या. मात्र, टीम इंडियाची सुरुवात अत्यंत खराब ठरली. सलामीवीर अभिषेक शर्मा पहिल्याच चेंडूवर आऊट झाला. यानंतर ईशान किशन आणि तिलक वर्मा यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी काही आकर्षक फटकेही मारले, पण पॉवरप्लेच्या शेवटच्या षटकात शॅडली वान शल्कविकने सामन्याचं चित्रच बदलून टाकलं. षटकाच्या दुसऱ्या चेंडूवर ईशान किशन (२० धावा) बाद झाला. पुढच्या दोन चेंडूवर तिलक वर्मा (२५) आणि शिवम दुबे (०) यांनाही माघारी पाठवले. शिवम दुबे बाद झाला तेव्हा भारताची धावसंख्या ४६/४ अशी होती.

यानंतर रिंकू सिंग आणि हार्दिक पांड्यांकडूनही अपेक्षित कामगिरी झाली नाही. रिंकू सिंग ६ धावांवर मोहम्मद मोहसिनचा बळी ठरला, तर हार्दिक पंड्याला हरमीत सिंगने बाद केलं. हार्दिक आऊट झाला तेव्हा भारताचा स्कोअर ७७/६ असा झाला होता. येथून अक्षर पटेल आणि कर्णधार सूर्यकुमार यादव यांनी सातव्या विकेटसाठी ४१ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी केली. अक्षर पटेल १४ धावा करून हरमीत सिंगचा बळी ठरला. अक्षर बाद झाल्यानंतर काही वेळातच सूर्यकुमार यादवने आपली अर्धशतकी खेळी पूर्ण केली. सूर्यकुमार यादव एकाकी झुंज देत क्रीजवर ठाम उभा राहिला. मात्र दुसऱ्या टोकाला अर्शदीप सिंग (४) आणि वरुण चक्रवर्ती (०) यांची विकेट्स पडत राहिल्या. सूर्यकुमार यादवने ४९ चेंडूमध्ये नाबाद ८४ धावांची जबरदस्त खेळी केली. या खेळीत त्याने १० चौकार आणि ४ षटकार लगावले. अमेरिकेकडून शॅडली वान शल्कविकने उत्कृष्ट गोलंदाजी करत २५ धावांत ४ विकेट्स घेतल्या, तर हरमीत सिंगला २ विकेट्स मिळाल्या.

लक्ष्याचा पाठलाग करताना अमेरिकन संघाची सुरुवात अत्यंत खराब झाली. पॉवरप्लेमध्येच यूएसएने तीन महत्त्वाच्या विकेट्स गमावल्या. येथून मिलिंद कुमार आणि संजय कृष्णमूर्ती यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. दोघांनी चौथ्या विकेटसाठी ५८ धावांची भागीदारी केला. मिलिंद कुमारने १०० स्ट्राईक रेटने ३४ धावा केल्या, ज्यात ३ चौकार आणि १ षटकार यांचा समावेश होता. मात्र, वरुण चक्रवर्तीने मिलिंदचा अडथळा संपवला. यानंतर मैदानावर फिरकीपटू अक्षर पटेलचा जादू पाहायला मिळाला. अक्षरने सलग चेंडूवर संजय कृष्णमूर्ती आणि हरमीत सिंग यांना बाद करत अमेरिकन डावाची कणा मोडली. संजयने २ चौकार आणि १ षटकारासह ३१ चेंडूत ३७ धावा केल्या, तर हरमीत सिंगला खातेही उघडता आलं नाही. अखेरीस अमेरिकन संघ भारतीय गोलंदाजीपुढे टिकू शकला नाही आणि डाव १३२ धावांवर आटोपला.

**भारत अमेरिकेकडून ५०० अब्ज डॉलर्सची खरेदी करणार**

**दोन्ही देश नॉन-टॅरिफ अडथळे दूर करतील**

# रशियाकडून तेल घेतल्याने अमेरिकने दंडित केलेला २५ टक्के टॅक्स आजपासून रद्द

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दिल्ली, : भारत आणि अमेरिकेने अंतरिम व्यापार करार चा आराखडा जाहीर केला आहे. या कराराअंतर्गत, भारतीय वस्तूंवरील अमेरिकेचे शुल्क ५० वरून १८ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आलं आहे. रशियाकडून तेल खरेदी करण्यासाठी भारतावर लादण्यात आलेला अतिरिक्त २५ कर देखील काढून टाकण्यात आला आहे. दोन्ही देशांनी सांगितले की फ्रेमवर्क लवकरच लागू केली जाईल आणि वाटाघाटी व्यापक द्विपक्षीय व्यापार करार च्या दिशेने पुढे जातील. भारत-अमेरिका संयुक्त निवेदनानुसार ही फ्रेमवर्क १३ फेब्रुवारी २०२५ रोजी सुरू झालेल्या भारत-अमेरिक बीटीए वाटाघाटींना पुढे नेईल.

भारत पुढील पाच वर्षात अमेरिकेकडून ५०० अब्जची खरेदी करणार

या करारात बाजारपेठेत प्रवेश, पुरवठा साखळी मजबूत करणे आणि व्यापारातील अडथळे कमी करणे या तरतुदींचा समावेश असेल. या कराराअंतर्गत, भारत अमेरिकन औद्योगिक वस्तूंवरील सर्व शुल्क काढून टाकेल किंवा कमी करेल. वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांनी सांगितले की या करारामुळे भारतीय निर्यातदारांसाठी ₹३० ट्रिलियन (अंदाजे २७.१८ लाख कोटी रुपये) बाजारपेठ खुली होईल. त्यांच्या मते, एमएसएमई, शेतकरी आणि मच्छीमार हे सर्वात मोठे लाभार्थी असतील आणि यामुळे महिला आणि तरुणांसाठी लाखो नवीन नोकऱ्या निर्माण होण्याची अपेक्षा आहे. शिवाय, भारताने पुढील



पाच वर्षात अमेरिकेकडून ₹५०० अब्ज (४.५३ ट्रिलियन रुपये) किमतीची उत्पादने खरेदी करण्यास सहमती दर्शविली आहे.

दोन्ही देश नॉन-टॅरिफ अडथळे दूर करतील

पियुष गोयल म्हणाले की, दोन्ही देशांनी काही नियम स्थापित करण्याचा निर्णय घेतला आहे जेणेकरून या कराराचे फायदे कोणत्याही तिसऱ्या देशापेक्षा प्रामुख्याने अमेरिका आणि भारताला मिळतील. भारत आणि अमेरिकेचे या व्यापार करारातील नॉन-टेरिफ अडथळे दूर करण्यावर विशेष लक्ष आहे. हे अडथळे टॅरिफ नसून व्यापार गुंतागुंतीचे आहेत. अमेरिकन वैद्यकीय उपकरण कंपन्यांना भारतात किंमत नियम आणि नोंदणी विलंब यासारख्या अडथळ्यांचा सामना करावा लागला आहे. भारताने हे दीर्घकालीन अडथळे दूर करण्याचे आश्वासन दिले आहे जेणेकरून अमेरिकन वैद्यकीय उपकरणे भारतात सहजपणे विकता येतील. यामुळे भारतीय रुग्णालये आणि रुग्णांना चांगल्या आणि अधिक परवडणाऱ्या अमेरिकन तंत्रज्ञानाची उपलब्धता मिळू शकेल. भारतात अमेरिकन आयसीटी उत्पादने आयात करण्यासाठी परवाना प्रक्रिया खूप गुंतागुंतीची आणि वेळखाऊ होती. भारताने या परवाना प्रक्रिया सोप्या आणि जलद करण्यास सहमती दर्शविली आहे. यामुळे अमेरिकन आयटी आणि टेक कंपन्यांना बाजारपेठेत प्रवेश सुलभ होईल आणि भारतात परवडणाऱ्या आणि दर्जेदार उपकरणांची उपलब्धता सुनिश्चित होईल.

भारत अमेरिकन मानके आणि चाचणी ओळखण्यासाठी काम करेल

करार अंमलात आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडक क्षेत्रांमध्ये अमेरिकन मानके (अमेरिकेत वापरले जाणारे) आणि चाचणी आवश्यकता स्वीकारता येतील का हे देखील भारत ठरवेल. जेव्हा एखादी अमेरिकन कंपनी भारतात आपल्या वस्तू विकू इच्छिते तेव्हा भारतात वेगवेगळे मानके आणि चाचणी आवश्यक असतात. अमेरिकन उत्पादनांची आधीच अमेरिकन मानकांनुसार चाचणी केली गेली असली तरी, भारताला अनेकदा दुसऱ्या चाचणी प्रक्रियेची आवश्यकता असते. याचा अर्थ भारतात त्याच उत्पादनाची पुन्हा चाचणी केली जाते. यामुळे वेळ लागतो, खर्च वाढतो, वस्तू महाग होतात आणि व्यापार मंदावतो. करार अंमलात आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत निवडक क्षेत्रांमध्ये चाचण्या घेण्याचे भारताने आश्वासन दिले आहे. हे अमेरिकन मानके थेट स्वीकारता येतील का ते तपासेल. जर त्या मानकांनुसार अमेरिकेत वस्तूंची आधीच चाचणी झाली असेल, तर भारतात पुन्हा चाचणी घेण्याची आवश्यकता राहणार नाही. संयुक्त निवेदनात म्हटले आहे की सकारात्मक परिणाम सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न केले जातील. याचा अर्थ असा की शक्य तितके अमेरिकन मानके ओळखण्यासाठी प्रयत्न केले जातील.

# शेतकरी जगला पाहिजे या भूमिकेवर ठाम, ओंकार शुगर ग्रुपची कृतीतून सिद्ध झालेली बांधिलकी

## ग्रूपचे ५० लाख क्रशिंग पूर्ण तर १२७० कोटी ऊस बिले अदा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भाळवणी/प्रतिनिधी : ओंकार शुगर ग्रुपने गळीत हंगाम २०२५–२६ मध्ये शेतकरी हिताला केंद्रस्थानी ठेवत एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे. या हंगामात ओंकार ग्रुपच्या सर्व साखर कारखान्यांमार्फत एकूण ५० लाख मे.टन ऊस गाळप यशस्वीरीत्या पूर्ण झाले असून यामुळे परिसरातील हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या गाळपासाठी शेतकऱ्यांनी पुरवठा केलेल्या ऊसापोटी ओंकार शुगर ग्रुपने एकूण १२७० कोटी रुपयांचे ऊस बिल सर्व युनिट्समार्फत वेळेत व पूर्णपणे अदा करण्यात आले आहे.

सर्वोच्च ऊस दर, काट्यावर योग्य वजन आणि वेळेवर ऊस बिल ही ओंकार शुगर ग्रुपची ठाम ओळख असून ही परंपरा याही हंगामात कृतीतून सिद्ध झाली आहे.

ओंकार ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रेपाटील यांनी यापूर्वीच स्पष्ट शब्दांत सांगितले होते की, शेतकरी जगला पाहिजे, शेतकऱ्याच्या घामाला योग्य दाम मिळालाच पाहिजे. कुठेही वजन करा आणि ऊस घेऊन या काटा बरोबरच राहील, शेतकऱ्याला सर्वोच्च ऊस दर दिला जाईल आणि ऊस बिल वेळेत मिळेल, ही त्यांची ठाम भूमिका होती. आज गळीत हंगाम २०२५–२६ मध्ये ओंकार शुगर ग्रुपने ही भूमिका केवळ शब्दांत नव्हे तर कृतीतून करून दाखवली आहे.


ओंकार शुगर ग्रुपच्या विविध युनिट्समध्ये आधुनिक यंत्रसामग्री, पारदर्शक व्यवस्थापन आणि नियोजनबद्ध गाळपामुळे शेतकऱ्यांचा ऊस वेळेत गाळपाला गेला. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला नाही तसेच त्यांचे उत्पन्न सुरक्षित राहिले. शेतकऱ्यांचा ऊस हा आमची जबाबदारी आहे या भावनेतून ओंकार ग्रुपने कामकाज केले आहे.

या माध्यमातून केवळ साखर उत्पादनच नव्हे तर शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण, ग्रामीण अर्थव्यवस्थेचा विकास आणि स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती साधली जात आहे. भविष्यातही शेतकरी केंद्रबिंदू ही भूमिका कायम ठेवत, ओंकार शुगर ग्रुप शेतकरी हितासाठी, ग्रामीण विकासासाठी आणि विश्वासार्ह उद्योग समूह म्हणून वाटचाल सातत्याने पुढे नेत राहील, असा ठाम विश्वास शेतकऱ्यांतून व्यक्त होत आहे.



# कळंब येथील कल्पना नगरमध्ये रमाई जयंती उत्साहात साजरी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कल्पना नगर येथे लिंम्बुनी बौद्ध विहार व माता रमाई चौकात माता रमाई जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी माता रमाई यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी माता रमाई यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत त्यांचा संघर्ष, त्याग आणि समाजासाठी दिलेले योगदान याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यानंतर मान्यवर व युवकांनी सामूहिक बुद्धवंदना घेतली. परिसरातील नागरिक, युवक व ज्येष्ठ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतपाल बनसोडे, राहुल हौसलमल, बाळासाहेब हौसलमल, रोहिदास गायकवाड, सुनील जेवर, बबलू गायकवाड, संदीप कांबळे,राहुल गायकवाड, संदीप सावंत, शरद धावरे, सार्थक गायकवाड,कृष्णा शेळके, मनीषा बनसोडे, गंगाबाई गायकवाड, नलीनी बनसोडे, चांदणी गायकवाड, यांच्या सह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रम संपन्न झाल्यानंतर उपस्थितांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

# वैनतेय विद्यामंदिरात रमाईंना अभिवादन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी : त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिरातील विद्यार्थ्यांनी रमाबाई आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

शाळेतील विद्यार्थीनी स्वरा बनसोडे हिने आपल्या वाढदिवसानिमित्त रमाबाई आंबेडकर यांची प्रतिमा शाळेला भेट दिली. तिच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. शिक्षक गोरख सानप यांनी रमाबाई आंबेडकर यांच्या जीवनकार्याची माहिती दिली.असुन धम्मदिप आहिरे, आदर्श बनसोडे या विद्यार्थांनी 'नांदन नांदन माझ्या रमाचं नांदन' हे गीत सादर केले

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खडतर आयुष्यात सोबतीने राहून अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत संसाराचा गाडा ओढणा–या रमाईंचा त्याग आणि संघर्ष समाजासाठी प्रेरणादायी आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण खैरनार यांनी केले आभार गोरख सानप यांनी मानले.



# ठाण्यात श्रीमद् भागवत कथा सप्ताह कार्यक्रमात 'दैनिक समर्थ गांवकरी' दिनदर्शिकेचे भव्य प्रकाशन!



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे : ठाणे शहरातील धनलक्ष्मीबेन नानाजीभाई ठक्कर ठाणावाला पशुवैद्यकीय दवाखान्यात श्रीमद् भागवत कथा सप्ताह सोहळ्याचे भव्य आयोजन करण्यात आले होते. या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते करण्यात आले.

याच वेळी दैनिक समर्थ गांवकरी दिनदर्शिकेच्या प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. सदर दिनदर्शिकेचे प्रकाशन ह.भ.प. जिग्नेश महाराज जोशी व ज्येष्ठ समाजसेवक नानजीभाई खेमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या शुभहस्ते पार पडले.

या कार्यक्रमास वसंत बुचडे, कांतीराम बोराडे, फिरोजभाई पटेल, महेंद्रभाई रॉडीक्स, दिनेशभाई ठक्कर, नामदार राही, राजेंद्र पांडे, राजेंद्र पुराणीक तसेच दैनिक समर्थ गांवकरीचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम भक्तिमय वातावरणात व उत्साहात पार पडला.

# वागदरी येथे संत तुकाराम महाराज गाथा पारायण व महाशिवपुराण कथा ज्ञानयज्ञ सप्ताह सुरुवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तुळजापूर तालुक्यात सर्वत्र जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या माध्यमातून लोकशाहीचा उत्सव साजरा होत असतानाच वागदरी ता.तुळजापूर येथे मात्र लोकशाहीच्या उत्सवाबरोबरच ह.भ.प. राजकुमार पाटील यांच्य आभिष्ठानाखाली श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण व महाशिवपुराण कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाची सुरुवात मोठ्या उत्साहात करण्यात आली असून या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण व महाशिवपुराण कथा ज्ञानयआणिज्ञ, सामुदायिक विवाह सोहळा, श्री संत भवानसिंग महाराज भजनी मंडळ वागदरी व समस्त ग्रामस्थांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दि.२ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २२६ दरम्यान श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण व महाशिवपुराण कथा ज्ञानयज्ञ सप्ताहाचे व सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या निमित्ताने विविध धार्मिक कार्यक्रम आयोजन करण्यात आले आहे.

दि.२ फेब्रुवारी २२६ पासून रीतसर या सप्ताहाची सुरुवात झालेली असून दिनांक २ ते ९ फेब्रुवारी दरम्यान दररोज सकाळी काकड आरती नंतर श्री संत तुकाराम महाराज गाथा वाचन केले जाते तर दुपारच्या दरम्यान ह.भ.प.मधुकर .नांदरे महाराजांच्या अधिपत्याखाली महाशिवपुराण कथा वाचन व संध्याकाळी कीर्तन प्रवचन आणि हरिजागराचा कार्यक्रम अशा पद्धतीने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले आहे. या सप्ताहाचीसोमवार दि.९ फेब्रुवारी २२६ रोजी ह.भ.प. श्रीहरी ढेरे महाराजांच्या काल्याच्या कीर्तने या सप्ताहाची सांगता होणार आहे.

**संजय घाडी यांचीही उपमहापौर पदासाठी उमेदवारी**

# मुंबईच्या महापौरपदासाठी भाजपकडून रितू तावडे यांची उमेदवारी निश्चित; भाजपच्या रितू तावडे मुंबईच्या महापौर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई,(केतन भोज);मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी भाजपकडून अखेर अधिकृत उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे.ज्येष्ठ नगरसेविका रितू तावडे या महापौरपदाचे उमेदवार म्हणून घोषणा करण्यात आली आहे. सुरुवातीपासून महापौरपदाच्या शर्यतीत प्रबळ दावेदार असणार्या रितू तावडे या भाजपच्या अत्यंत अनुभवी आणि निष्ठावान नगरसेविका मानल्या जातात.मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली.तर मुंबईच्या उपमहापौरपदासाठी शिवसेना शिंदे सेनेचे नगरसेवक संजय घाडी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.संजय घाडी यांचा कार्यकाळ पहिला सव्वा वर्षे असणार आहे.

भाजपा हा शिस्तबद्ध पक्ष आहे. पक्ष जो निर्णय घेतो,तो आम्हाला मान्य असतो.माझ्यासाठी हा ऐतिहासिक क्षण आहे.सर्वांचे आभार मानते.मुंबईच्या महापौरपदी निवड झाली असली तरी मुंबईची सेवक म्हणून काम करणार आहे.असे यावेळी रितू तावडे यांनी सांगितले.

कोण आहेत रितू तावडे?

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्र.१३२ मधून रितू राजेश तावडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला होता.गुजरातीबहुल भागातून निवडून येणाऱ्या त्या मराठी नगरसेविका आहेत.

मुंबई महापालिकेच्या शिक्षण समितीच्या माजी अध्यक्ष राहिल्या आहेत.

रितू तावडे या मुंबई मनपाच्या



स्थापत्य समितीच्या उपाध्यक्ष राहिल्या आहेत.

ईशान्य मुंबईतील भाजपाचा एक आक्रमक चेहरा म्हणून रितू तावडे यांची ओळख आहे.

रितू तावडे यांनी महाराष्ट्र प्रदेश भाजप महिला मोर्चाच्या उपाध्यक्ष आणि ईशान्य मुंबई महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष म्हणून प्रभावी काम केले आहे.

सध्या त्या मुंबई महिला मोर्चा कार्यक्रम समितीच्या संयोजिका आहेत.

# श्री विक्रम नाईक नवरे यांना पत्रकारितेमध्ये पदवी प्राप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : श्री विक्रम राजाराम नाईक नवरे यांना पत्रिका मध्ये पदवी प्राप्त करण्यात आली व प्रथम श्रेणीत संपादन केले आहे. शिक्षणाचे माध्यम मराठी ठेवून त्यांनी माध्यम आणि पत्रकारिता क्षेत्रातील मेहनत, व सातत्य आणि गुणवत्तेचे उद्धव उदाहरण घालून दिले आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ३१ व्या दीक्षित समारंभात सुमारे एक लाख २४ हजार विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली. या दीक्षांत सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून माझी अतिरिक्त मुख्य सचिव डॉक्टर निर्मलजीत सिंह कलसी उपस्थित होते. तसेच विद्यार्थ्यांचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रमाला हजारी लावली व उपस्थिती दर्शवली.

# वागदरी येथील मतदान केंद्रावर ६३.८३% मतदान शांततेत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/प्रतिनिधी : तुळजापूर तालुक्यातील वागदरी येथे जिल्हा परिषद नंदगाव गट व या गटांतर्गत येणाऱ्या खुदावाडी पंचायत समिती गणाचे प्रतिनिधी निवडीसाठी येथील मतदान केंद्रावर मतदान अत्यंत शांततेत व खेळी मेळीच्या वातावरणात पार पडले.

सकाळी ठिक ७.३० वा. दरम्यान येथील जि.प.प्राथमिक शाळेतील मतदान केंद्रावर मतदानाला सुरुवात झाली.सकाळी लवकर शेती कामावर जाणारे कामगार, शेतकरी,कामा निमित्ताने बाहेर गावी जाणारे मतदार यानी आपला मतदानाचा हक्क बजावून गेले. संत गतीने सुरूवात झालेल्या मतदनाला दुपारी दोन नंतर गती आली. विशेष म्हणजे महिला मतदारांची गर्दी मतदान केंद्रावर झाली. त्यानंतर जस जसी मतदानाची वेळ संपत येईल




तस तसे पुरुष मतदारानी मतदान केंद्रावर गर्दी केली.विशेषता तरुण मतदारानी लोकशाही उत्सवाचा आनंद घेतला.येथील एकून १०२३ मतदारा पैकी ६२४ मतदारानी आपला मतदानाचा हक्क बजावला.यात ३३० पुरुष तर २९४ स्त्री मतदरानी मतदाना केले.एकंदरीत वागदरी येथिल मतदान केंद्रावर ६.९९ % मतदान झाले असून नंदगाव जि.प. गटात सरासरी ६०% मतदान झाले.

# आज मेरा बुद्रुक येथे संकल्पपूर्ती सोहळ्यानिमित्त भव्य कीर्तनाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कैलास आंधळे / चिखली तालुका प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील मेरा बुद्रुक येथे रविवारी श्री.संत गजानन महाराज प्रकटदिनाच्या पावन पर्वानिमित्त महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कीर्तनकार आवाजाचे जादूगार ह.भ.प श्री. पुरुषोत्तम महाराज पाटील भुतेकर यांचा कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला असून ह्या कीर्तन सोहळ्याचा सर्व श्रोत्यांनी लाभ घेण्याचे आयोजकडून आव्हान करण्यात येत आहे. मेरा बुद्रुक येथील सरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य व गावकऱ्यांनी या संकल्पपूर्ती सोहळ्या निमित्त भव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले असून,या सोहळ्यात महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कीर्तनकार व आवाजाचे जादूगार ह.भ.प.श्री.पुरुषोत्तम महाराज




पाटील (भुतेकर) यांचे प्रेरणादायी कीर्तन संपन्न होणार आहे.हा कीर्तन सोहळा रविवार दिनांक ८ फेब्रुवारी २०२६ रोजी सायंकाळी ८ वाजता मेरा बुद्रुक येथील मारुती मंदिरासमोर,बाजारगल्ली रोड,मेरा बुद्रुक येथे आयोजित करण्यात आला आहे. श्री.गजानन महाराजांच्या भक्तीसह संस्कारमूल्यांचा जागर करणारा हा सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडणार असून,परिसरातील भाविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.या कीर्तन सोहळ्याचा लाभ श्रोत्यांनी मोठ्या संख्येने घ्यावा,असे आव्हान आयोजक सरपंच,उपसरपंच,सर्व ग्रामपंचायत सदस्य,समस्त गावकरी मंडळी तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते गजानन वायाळ यांनी केले आहे.



**ह.भ.प पुरुषोत्तम महाराज पाटील यांच्या भव्य कीर्तनाचा श्रोत्यांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आयोजकाकडून आव्हान**

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या पाच विद्यार्थी खेळाडूंची राष्ट्रीय स्पर्धेसाठी विद्यापीठ संघात निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या क्रिकेट संघाने आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश संपादन केले. या उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर महाविद्यालयातील पाच क्रिकेटपटूंची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या क्रिकेट संघात राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

ही क्रिकेट स्पर्धा गुजरात राज्यातील सौराष्ट्र येथे होणार आहे. या निवड झालेल्या खेळाडूमध्ये कर्णधार दिनेश शिंगाडे, मारुती कांबळे, प्रवीण वाघमारे, ओंकार रोकडे आणि अथर्व देशमाने यांचा समावेश आहे.



दिनेश शिंगाडे



प्रवीण वाघमारे



ओंकार रोकडे



अथर्व देशमाने



मारुती कांबळे

निवड झालेल्या खेळाडूंना महाविद्यालयाच्या जिमखाना विभागामार्फत सातत्यपूर्ण सराव, मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले. या यशामध्ये शारीरिक शिक्षण संचालक प्रा. विठ्ठल फुले, प्रा. मनोज खपाले व प्रा. अनिल परमार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या उल्लेखनीय यशाबद्दल निवड झालेल्या खेळाडूंचा सन्मान महाविद्यालयात करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव सर, महाविद्यालयाचे उपप्राचार्य, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग तसेच सेवक वर्ग उपस्थित होते. सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना राष्ट्रीय स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या निवडीमुळे महाविद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला असून, भविष्यातही खेळाडूंनी अशीच उज्ज्वल कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# कर्मयोगी वाघ यांची पुण्यतिथी साजरी




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित, के. के. वाघ कला, वाणिज्य, विज्ञान व संगणक महाविद्यालय काकासाहेबनगर महाविद्यालयात कर्मयोगी कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. अरुण ठोके यांनी आपल्या भाषणातून कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकताना त्यांच्या शिक्षण, संस्कार आणि समाजसेवेचा ध्यास या गुणांसंदर्भात विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एल. जाधव होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून भाऊंच्या त्यागी वृत्तीचे आणि त्यांनी केलेल्या समाजकार्याचे यथोचित वर्णन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुनीता शिरसाठ यांनी केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. अतुल गवारे, महाविद्यालय विकास समिती सदस्य रामनाथ पानगव्हाणे, रामभाऊ पाटील, वैभव कुशारे, आय. क्यू. ए. सी. समन्वयक प्रा. प्रा. मिलिंद पवार, डॉ. भावना पौळ, डॉ. त्र्यंबक बाबळे, प्रा. शीतल जगताप, प्रा. मुक्ता मोरे, डॉ. प्रतिभा बाहेकर, प्रा. निलेश आहेर, प्रा. बाळकृष्ण फडे, प्रा. अर्चना ताकाटे, प्रा. भारती कुशारे, प्रा. काजल वाघ, प्रा. प्रतिक पाटील, प्रा. संकेत जाधव, प्रा. पल्लवी कदम, अनिल राजोळे, ज्ञानेश्वर गवळी, आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येनं उपस्थित होते.

# चंद्रावर वाजणार आयफोन ची रिंगटोन, नासाने अंतराळवीरांना दिली परवानगी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : चंद्रावर प्रवास करणारे अंतराळवीर आता आयफोन सोबत घेऊन जाऊ शकतील. अमेरिकन अंतराळ संस्था, नासाने आता अंतराळवीरांना आयफोन आणि इतर आधुनिक स्मार्टफोन घेऊन जाण्याची परवानगी दिली आहे. नासाचे प्रशासक जेर इसाकमन यांनी सांगितले की क्रू-१२ आणि आर्टेमिस २ मोहिमांमध्ये जाणारे अंतराळवीर त्यांच्यासोबत फोन घेऊन जाऊ शकतील. हे फोन अंतराळात फोटो काढण्यासाठी, त्यांच्या कुटुंबियांशी संपर्कात राहण्यासाठी आणि इतरांसोबत अंतराळाचे फोटो आणि व्हिडिओ शेअर करण्यासाठी वापरले जाऊ शकतात.

आतापर्यंत, अंतराळवीरांना वैयक्तिक फोन अंतराळात घेऊन जाण्याची परवानगी नव्हती. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील अंतराळवीर ईमेल, मेसेजिंग आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी लॅपटॉप वापरत होते. सुरक्षितता, टिकाऊपणा आणि सुरक्षिततेच्या चिंतेमुळे, फोन पूर्वी प्रतिबंधित होते. नासाने आता हा नियम बदलला आहे. इसाकमन म्हणाले की जुन्या नियमांचा पुनर्विचार करण्यात आला आहे. या निर्णयाकडे नासातील सांस्कृतिक बदल म्हणून देखील पाहिले जात आहे, जिथे कालबाह्य झालेले किंवा आता संबंधित नसलेले नियम आता पुनरावलोकन केले जात आहेत.

# पंतप्रधान मोदींच्या मलेशिया दौऱ्यामुळे भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला मिळणार बळकटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्या निमंत्रणानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मलेशियाचा दोन दिवसांचा अधिकृत दौरा सुरू केला आहे. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून पंतप्रधान मोदींचा हा तिसरा मलेशिया दौरा आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदींच्या या दौऱ्यामुळे भारताच्या ॲक्ट ईस्ट धोरणाला कशी गती मिळते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.

या भेटीदरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी मलेशियन समकक्षांसोबत द्विपक्षीय सहकार्याच्या विविध पैलूंवर व्यापक चर्चा करणार आहेत. पंतप्रधान मलेशियातील भारतीय समुदायाच्या सदस्यांशी संवाद साधतील, तसेच व्यापारी नेते आणि उद्योग प्रतिनिधींना भेट देतील. परराष्ट्र मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, ही भेट १० व्या भारत-मलेशिया सीईओ फोरमच्या निमित्ताने होणार आहे. भारत आणि मलेशियाचे जुने संबंध आहेत जे सामायिक इतिहास, संस्कृती आणि सभ्यतेमध्ये खोलवर रुजलेले आहेत.

भारताचे ॲक्ट ईस्ट धोरणाचे उद्देश आग्नेय आशिया, पूर्व आशिया आणि आशिया-पॅसिफिक प्रदेशातील देशांशी भारताचे संबंध मजबूत करणे हा आहे. हे धोरण मूलतः १९९१ मध्ये तत्कालीन पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी स्वीकारलेल्या धोरणाशी संबंधित आहे. पंतप्रधान मोदींच्या मलेशिया भेटीमुळे या उपक्रमाला मोठी चालना मिळण्याची शक्यता आहे. आग्नेय आणि पूर्व आशियाई देशांसोबत व्यापार, गुंतवणूक आणि तांत्रिक सहकार्य वाढवणे हे पंतप्रधान मोदींनी पदभार स्वीकारल्यापासूनचे प्रमुख ध्येय आहे. सरकारने ॲक्ट ईस्ट पॉलिसी अंतर्गत भारताला आसियान राष्ट्रांशी जोडण्यासाठी वाहतूक, पायाभूत सुविधा आणि डिजिटल कनेक्टिव्हिटी (रस्ते, रेल्वे, बंदरे आणि डिजिटल नेटवर्क) विकसित करण्यासाठी सक्रियपणे काम केले आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये भारत आणि मलेशियाने त्यांचे संबंध व्यापक धोरणात्मक भागीदारीपर्यंत वाढवले. पंतप्रधान मोदींच्या भेटीदरम्यान, दोन्ही नेते प्रगतीचा आढावा घेतील आणि या भागीदारीतील भविष्यातील प्राधान्ये निश्चित करतील. भारतात मलेशियन गुंतवणूकीला प्रोत्साहन देणे आणि सखोल आर्थिक सहकार्यासह व्यापार आणि गुंतवणूक वाढविण्यावर चर्चा होणार आहे.

**ॲडव्हांटेज विदर्भ परिषद-२०२६; येत्या २-३ महिन्यांत भविष्योन्मुख धोरणे आणणार**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन**

# आगामी काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : येत्या काळात महाराष्ट्राचा भर धोरण आधारित विकासावर राहणार आहे. यासाठी आम्ही अनेक धोरणे आखली असली, तरी काही धोरणे जुनी झाली असल्याने भविष्यातील गरजा, बदल आणि आव्हाने लक्षात घेऊन येत्या दोन-तीन महिन्यात विविध क्षेत्रांतील भविष्योन्मुख (फ्युचर रेडी पॉलिसी) धोरणे आणली जाणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटद्वारे आयोजित डव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी इंटरनॅशनल बिझनेस कॉनक्लेव्हचे उद्घाटन झाले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी, असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांच्यासह तब्बल २२ देशांचे राजदूत, उच्चायुक्त व बिझनेस प्रतिनिधींची प्रमुख उपस्थिती होती. विशेष म्हणजे याच परिषदेत गुंतवणुकीचे तीन सामंजस्य करारही पार पाडण्यात आले.

यावेळी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र हे सध्या वेगाने विकसित होणारे राज्य आहे. त्यातल्या त्यात विदर्भाचा प्रदेश झपाट्याने विकसित होत आहे. महाराष्ट्रात सामंजस्य करार केवळ कागदावर होत नसून ते प्रत्यक्षात साकारले जात आहेत. लॉजिस्टिक्स, एआय, सोलर क्षेत्रामध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे.

राज्य सरकारने गेल्या काही महिन्यांमध्ये जीसीसी पॉलिसी, जेम्स अँड ज्वेलरी पॉलिसी, बांबू पॉलिसी जाहीर केली आहे. नवे औद्योगिक धोरण आले आहे. त्यानंतर आता सात



नवीन धोरणांची घोषणा येत्या दोन-तीन महिन्यांत होणार आहे. यामध्ये टेक्सटाइल्स अँड ॲपरल, लेदर अँड फूटवेअर, इलेक्ट्रॉनिक्स अँड फॅब, एरोस्पेस अँड डीफेन्स, एमएसएमई, फार्मास्युटिकल बायोटेक अँड मेडिकल डीव्हायसेस, सर्क्युलर इकॉनॉमी, बायो प्लास्टिक या क्षेत्रांतील धोरणांचा समावेश असेल. या सातही धोरणांच्या निर्मितीचे काम सुरू असून येत्या तीन महिन्यांत ते जाहीर करण्यात येतील. यामुळे धोरणप्रेरित गुंतवणूक, उद्योगवाढ आणि आर्थिक विकास हेच महाराष्ट्राचं प्रमुख सूत्र ठरेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

सोलर मॉड्यूलच्या क्षेत्रात नागपूर क्षेत्रात येणारी गुंतवणूक ही देशातील सर्वात मोठी सोलर मॉड्यूल प्रोड्यूसिंग इकोसिस्टीम असून अद्यापही गुंतवणुकीचा ओघ मोठ्या प्रमाणात सुरुच आहे. कृषी प्रक्रियेसह अनेक निर्मितीक्षम क्षेत्रात नागपूर आणि विदर्भाची मोठ्या प्रमाणात आगेकूच सुरु आहे, अनेक क्षेत्रात गुंतवणुकीच्या नव्या संधी येत आहेत. अगदी गडचिरोलीसारख्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित होत असून भारताचे स्टील हब म्हणून ते पुढे येत आहे. पुढील दहा वर्षांत गडचिरोलीत पोलादनिर्मितीची सर्वाधिक मोठी क्षमता उभी राहणार आहे. एवढेच नाही, तर गडचिरोलीला पर्यावरणपूरक 'ग्रीन स्टील' हब म्हणून विकसित करण्याच्या दिशेनेही आम्ही ठोस पावले उचलत आहोत.

अदानी समूहाकडून काल कोल गॅसीफिकेशनच्या क्षेत्रात मोठी गुंतवणुक झाली आहे. देशातील अशा स्वरुपाच्या पहिल्याच गुंतवणुकीमुळे विदर्भातील कोल इकोसिस्टीमचे चित्र संपूर्णपणे बदलणार आहे. ईलेक्ट्रीक व्हेईकल्सच्या क्षेत्रात पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरमध्ये सर्वात मोठी गुंतवणूक येत आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले असोसिएशन फॉर इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंटचे अध्यक्ष आशिष काळे यांनी प्रास्ताविकात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात विदर्भाचा झपाट्याने विकास होत असल्याचे सांगितले. ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमने १५० देशांसोबत करार केला असून त्याचा लाभ विदर्भातील एमएसएमईंना स्वतःचा व्यवसाय वाढविण्यासाठी होणार असल्याची माहिती ग्लोबल इंडिया बिझनेस फोरमचे जागतिक अध्यक्ष जितेंद्र जोशी यांनी दिली. ॲडव्हांटेज विदर्भ-खासदार औद्योगिक महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी तीन महत्त्वाचे सामंजस्य करार झालेत. यामध्ये पहिला करार महामेट्रो आणि केअर हॉस्पिटलमध्ये झाला. यात कस्तुरचंद पार्कजवळ महामेट्रोच्या जागेवर पीपीपी मॉडेलवर आधारित सुमारे साडेतीनशेवर खाटांच्या बहुविशेषोपचार हॉस्पिटलचा समावेश असून त्यासाठी सुमारे सहाशे कोटींची गुंतवणूक होत आहे. या प्रकल्पातून सुमारे पंधराशे ते अठराशे रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे.

दुसरा करार गॅलक्सी सोलर कंपनीसोबत झाला. कंपनीद्वारे १० हजार कोटींची गुंतवणूक करत सोलर सेल, बॅटरी स्टोअरेज सिस्टीमची निर्मिती होईल. या प्रकल्पाद्वारे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा सुमारे चार हजार रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे. तिसरा करार टेलिकॉम टॉवरची निर्मिती करणाऱ्या जीआर इन्फ्रास्ट्रक्चरसोबत झाला आहे. कंपनीने २०० कोटींची गुंतवणूक करण्याची घोषणा केली असून याद्वारे सुमारे पाचशे रोजगारांची निर्मिती अपेक्षित आहे.

मुख्यमंत्र्याचे आर्थिक सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी या करारांची माहिती दिली.